Shri Warana Vibhag Shikshan Mandal`s

# Yashwantrao Chavan Warana Mahavidyalaya, Warananagar

Tal. Panhala, Dist. Kolhapur

National Service Scheme







**I/C Principal**
**Prof. (Dr.) P. S. Chikurdekar**

**Programme Officer**
**Dr. C. R. Jadhav**

**Programme Officer**
**Dr. R. P. Kavane**

## Board of Advisory Committee

1) **Prof. (Dr.) P. S. Chikurdekar –I/C, Principal**

2) Dr. C. R. Jadhav - Programme Officer

3) Dr. -R. P. Kavane - Programme Officer

4) Dr. Mrs. P. S. Ahuja - Member

5) Dr. Smt. P. R. Salokhe - Member

6) Shri. Dinesh Patil - Member

8) Shri. A. S. Nalawade- Clerk

9) Shri. Suraj Patil - Clerk

## Profile of NSS Programme Officers

| Sr. No. | Name of Programme Officers | Qualification | Teaching Experience | NSS Experience |
|---|---|---|---|---|
| 1. | **Dr. C. R. Jadhav** | M.A., M. Phil., SET., Ph.D. | 15 Years | 10 Years |
| 2. | **Dr. R. P. Kavane** | M.Sc., Ph.D. | 17 Years | 03 Years |

Glimpses

of

National Service Scheme

NSS Programme started in our institution as a single unit with the intake capacity of 100 students, in 1971. Due to active participation of the students, our institution got sanction of two NSS units with 200 intake capacity in the year 1990. Since then two Programme Officers are working regularly and meticulously.

Till today, about 6300 volunteers have participated and completed the two year NSS programme. Different activities like Anti-addiction Rallies, Anti-superstition Programmes, Anti-dowry Campaign, Adult Education, Blood Donation Camps, Aids Awareness Programme, Save Daughter Girl Campaign, Tree Plantation, Environment Protection Rallies, Flood relief program etc. are undertaken in College and adopted village. In last six years, we planted more than 5540 seedling in the adopted village, out of them 90% are growing well.

It is our pride to mention here that, since the beginning of NSS programme in our College, we arrange special Residential Camps in the Adopted Village. During these camps volunteers undertake various labour oriented activities like Water Conservation, Water Shade Management, Cleaning of Drinking Water Wells and Lakes, Road Construction, Tree Plantation Programmes etc., as a part of 'Gramm Swachata Abhiyan'. The Cultural Aspect is also taken into account for the counseling of the people and volunteers. For this we arrange lectures of eminent personalities.

It is noteworthy to mention here that, our students actively participated in the University and state level (Avhan) Camp. They are selected for **Pre-RD** Parade Mumbai, so also they work as Gram Swachata Doots.

Programme Officer
Y. C. Warana Mahavidyalaya, Warananagar.

# राष्ट्रीय सेवा योजना (NSS)




मा. प्राचार्या, डॉ. एस. बी. शहपुरे वृक्षारोपण करताना सोबत राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक



राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक वृक्षारोपण करताना



राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी वृक्षारोपण करताना



राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक वृक्षारोपण करताना



कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवक वृक्षलागवड करताना






राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक पूरग्रस्त जुने चावरे याठिकाणी स्वच्छता करताना



राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक पूरग्रस्त जुने चावरे याठिकाणी स्वच्छता करताना






राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक पूरग्रस्त जुने चावरे याठिकाणी स्वच्छता करताना



राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक महाविद्यालय परिसर स्वच्छता करताना



राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक वनस्पती उद्यानाची स्वच्छता करताना




यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय,
वारणानगर
सार्वजनिक निवडणूक कृती कार्यक्रमांतर्गत (SWEEP)
आयोजित
मतदान व मतदार जनजागृती रॅली
दि. ३ ऑक्टोबर २०१९






Samsung Triple Camera
Shot with my Galaxy A30s


Samsung Triple Camera
Shot with my Galaxy A30s


आभारी आहोत







राष्ट्रीय सेवा योज
शेष श्रम संस्कार शिबीर
योजना
BUT 'YO
SCHEME




प्रा.डॉ.आर.पी.कावणे
कार्यक्रम अधिकारी

प्रा.डॉ.सी.आर.जाधव
कार्यक्रम अधिकारी

# यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर.

नियमित व विशेष शिबिरांच्या माध्यमातून झालेल्या कार्याचे निवडक बातमीसह अहवाल

## वारणा महाविद्यालयात पर्यावरण पूरक ५० वृक्षांचे रोपण

वारणानगर •प्रतिनिधी

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयामध्ये 'वृक्षसंवर्धन पंधरवड्या', निमित्त नवीन ५० हून अधिक पर्यावरण पूरक चिंच आणि करंजीच्या झाडांची लागवड करण्यात आली. कार्यक्रम प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे उपस्थित होत्या. या वेळी राष्ट्रीय छात्र सेनेच्या डॉ. जयंती गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. सी. आर. जाधव, डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, डॉ. एस. वाय. जाधव, प्रा. एम.जी. चिखलकर, स्वप्नील पाटील यांच्यासह प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



वारणा महाविद्यालयात वृक्षारोपण करताना प्रा.डॉ. सुरेखा शहापुरे. डॉ प्रकाश चिकुर्डेकर, जयंती गायकवाड, डॉ. सी. आर. जाधव, राष्ट्रीय छात्रसेना.

महाविद्यालयाल परिसरात प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने जाणीवपूर्वक प्रयत्न करून गेल्या तीन वर्षात तीनशेहून अधिक नवीन झाडांची लागवड करून वृक्षांचे संवर्धन ही केले आहे.

दरम्यान महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या वतीने पर्यावरण जनजागृती दिनही साजरा करण्यात आला या निमित्ताने प्रा. कल्पना चरापले यांचे व्याख्यान झाले. महाविद्यालयीन तरुणांनी पर्यावरण प्रेमी दूत म्हणून स्वतःपासूनच पर्यावरण रक्षणाची सुरुवात करून अखंड कार्यरत राहण्याची गरज असल्याचे सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्या सुरेखा शहापुरे होत्या. संयोजन लेफ्टनंट जयंती गायकवाड यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. सी.आर. जाधव यांनी आभार मानले.

...रे यांनी दै'जनप्रवास' प्रिंटींग प्रेस, प्लॉट क्र.२०/२४, जी.एम. इंडस्ट्रीयल इस्टेट, चंदनवाडी, मिरज, जि.सांगली येथे छापून दै.
▸ सांगली मुख्य कार्यालय : 'नेक्स्ट' बिल्डींग, सांगली जिमखान्यासमोर, राममंदिररोड, सांगली ✆ (०२३३)२३७७७७५, २३७७७७६
...४५५७७, मोबा. ९७३०४०१४१०. फॅक्स : (०२३१) २६४५५७७ ▸ मिरज कार्यालय : ✆ (०२३३) २२२३०७५, फॅक्स : (०२३३) २२२२४४६
...रोड, पुणे-४११०३८ : ✆ (०२०) २५४३६६२८. ▸ मुंबई कार्यालय : फॅक्स -दूरध्वनी) (०२२) २३८८२३१५ ▸ या अंकात प्रसिध्द झालेल्या
...कक्षेत) E-Mail Address - janpravas1@gmail.com, janpravas1@rediffmail.com

सकाळ

# 'पूरग्रस्तांच्या मदतीसाठी वारणा' उपक्रमास प्रतिसाद

वारणानगर, ता. १५ : येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाने 'पूरग्रस्तांच्या मदतीसाठी वारणा' या उपक्रमांतर्गत सामाजिक जाणीव ठेवून सहा लाख रुपयांपर्यंतची विविध स्वरूपाची मदत दिली. राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, कनिष्ठ महाविद्यालय आणि व्यवसाय अभ्यासक्रम विभागातील तसेच विनय कोरे करिअर अॅकॅडमी आजी-माजी विद्यार्थी संघ, प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनींनी पूरग्रस्तांसाठी कोल्हापूर, पन्हाळा, शाहूवाडी, हातकणंगले तालुक्यातील किणी, घुणकी, चावरे, भेंडवडे, खोची, काखे, निलेवाडी, पारगाव, धोपेश्वर, धनगरवाडा गावात, तर सांगली जिल्ह्यातील शिराळा-वाळवा तालुक्यातील सोनवडे, मराठवाडी, सिद्धार्थनगर, रेठरे, पुनवत, सोंडोली, मालेवाडी, देववाडी या गावात प्रत्यक्ष जाऊन स्वच्छता, अर्थसाहाय्य, अन्नधान्य, कपडे, जीवनोपयोगी वस्तू, स्वच्छ पाणी, सॅनिटरी नॅपकिन्स दिले.



**जुने चावरे : वारणानगर येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविका पूरग्रस्त बाधित क्षेत्रात श्रमदान करताना.**

प्रा. एस. आर. कुलकर्णी, डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, डॉ. एस. एस. खोत, प्रा. सत्यनारायण आर्डे, डॉ. जयंती गायकवाड, डॉ. सी. आर. जाधव, डॉ. आर. पी. कावणे, डॉ. आर. एस. पांडव, प्रा. मधुकर सुतार, प्रा. एस. व्ही. पवार, प्रा. एन. आर. चोपडे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. तात्यासाहेब कोरे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जॉन डिसोजा, प्रा. किरण पाटील यांच्या प्रयत्नातून सॅनिटरी नॅपकिनचे वितरण केले.

महाविद्यालयातील पूरबाधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, आवश्यक वह्या, पुस्तकांचे वितरणही केले. कोल्हापूर येथील ई-सीड्स, सन फार्मा इंडस्ट्रीज, नगर आणि मारुती चॅरिटेबल ट्रस्ट, केकले यांनीही सहभाग नोंदविला. गाव, नदीकाठ, मंदिरे, गटार, रस्ते सफाई व बाधित परिसरची स्वच्छता श्रमदानातून केली.

सकाळ

# 'पूरग्रस्तांसाठी वारणा' उपक्रमास प्रतिसाद

## यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयातर्फे पूरग्रस्त गावांत मदत, स्वच्छता

वारणानगर, ता. १५ : येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाने 'पूरग्रस्तांच्या मदतीसाठी वारणा' या उपक्रमांतर्गत सामाजिक जाणीव ठेवून सहा लाख रुपयांपर्यंतची विविध स्वरूपाची मदत दिली. राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, कनिष्ठ महाविद्यालय आणि व्यवसाय अभ्यासक्रम विभागातील, तसेच विनय कोरे करिअर अॅकॅडमी, आजी-माजी विद्यार्थी संघ, प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनींनी पूरग्रस्तांसाठी कोल्हापूर, पन्हाळा, शाहूवाडी, हातकणंगले तालुक्यांतील किणी, घुणकी, चावरे, भेंडवडे, खोची, काखे, नीलेवाडी, पारगाव, धोपेश्वर, धनगरवाडा गावात, तर सांगली जिल्ह्यातील शिराळा-वाळवा तालुक्यातील सोनवडे, मराठवाडी, सिद्धार्थनगर, रेठरे, पुनवत, सोंडोली, मालेवाडी, देववाडी या गावांत प्रत्यक्ष जाऊन स्वच्छता, अर्थसाहाय्य, अन्नधान्य, कपडे, जीवनोपयोगी वस्तू, स्वच्छ पाणी, सॅनिटरी नॅपकिन्स आदी मदत दिली.

प्रा. एस. आर. कुलकर्णी, डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, डॉ. एस. एस. खोत, प्रा. सत्यनारायण आर्डे, डॉ. जयंती गायकवाड, डॉ. सी. आर. जाधव, डॉ. आर. पी. कावणे, डॉ. आर. एस. पांडव, प्रा. मधुकर सुतार, प्रा. एस. व्ही. पवार, प्रा. एन. आर. चोपडे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. तात्यासाहेब कोरे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जॉन डिसोजा, प्रा. किरण पाटील यांच्या प्रयत्नातून सॅनिटरी नॅपकिनचे वितरण केले.

महाविद्यालयातील पूरबाधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, आवश्यक वह्या, पुस्तकांचे वितरणही केले. कोल्हापूर येथील ई-सीड्स, सन फार्मा इंडस्ट्रीज, नगर आणि मारुती चॅरिटेबल ट्रस्ट, केकले यांनीही सहभाग नोंदविला. गाव, नदीकाठ, मंदिरे, गटार, रस्ते सफाई व बाधित परिसराची स्वच्छता श्रमदानातून केली.



**काखे : वारणानगर येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविका पूरग्रस्त बाधित क्षेत्रात श्रमदान करताना.**

Kolhapur, Kolhapur-Today
16/09/2019 Page No. 9

# वारणा महाविद्यालयाच्यावतीने पूरग्रस्तांना सहा लाखाची मदत



**घोपेश्वर– धनगर वाडा : येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना कपडे आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप प्रसंगी विनय कोरे करिअर अकॅडमीचे स्वयंसेवक.**

प्रतिनिधी

वारणानगर

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाने "पूरग्रस्तांच्या मदतीसाठी: वारणा' या उपक्रमांअंतर्गत सहा लाख रुपयांपर्यंतची विविध स्वरूपाची मदत पोहोच करण्याची जबाबदारी यशस्वीपणे पार पडली.

राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, कनिष्ठ महाविद्यालय आणि व्यवसाय अभ्यासक्रम विभागातील तसेच विनय कोरे करिअर अकॅडमी आजी–माजी विद्यार्थी संघ , प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी पूरग्रस्तांसाठी कोल्हापूर पन्हाळा शाहूवाडी हातकणंगले तालुक्यात स्वच्छता, अर्थसहाय्य, अन्नधान्य, कपडे, जीवन उपयोगी वस्तू स्वच्छ पाणी, सॅनिटरी नॅपकिन्स, आणि अन्य सर्वतोपरी मदत करण्याचे कार्य यशस्वीपणे पार पाडले.

श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. विनय कोरे सावकर, प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम, प्राचार्या सुरेखा शहापुरे यांच्या प्रेरणेने पूरग्रस्तांसाठी च्या मदत कार्यात महाविद्यालयांने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या कामी प्रा. एस. आर. कुलकर्णी, डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, डॉ. एस. एस. खोत, प्रा. सत्यनारायण आर्डे, डॉ. जयंती गायकवाड, डॉ. सी. आर. जाधव, डॉ. आर. पी. कावणे, डॉ. आर. एस. पांडव, प्रा. मधुकर सुतार, प्रा. एस. व्ही. पवार, प्रा. एन. आर. चोपडे यांनी विशेष योगदान दिले. कोल्हापूर येथील ई–सीड्स, सन फार्मा इंडस्ट्रीज, अहमदनगर आणि मारुती चारीटेबल ट्रस्ट, केकले यांनीही विविध रूपांमध्ये या उपक्रमात सहभाग नोंदविला.

सकाळ



वारणानगर : येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयामध्ये आयोजित संविधान दिनानिमित्त 'संविधान शपथ' घेताना विद्यार्थी, स्वयंसेवक, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आदी.

## यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय

वारणानगर : अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सुरेखा शहापुरे होत्या. या निमित्ताने संविधान शपथ देण्यात आली. पाचशेहून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना स्वंयसेवकांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. डॉ. सी. आर. जाधव यांनी संविधान शपथ वाचन केले. २६/११च्या हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या जवानांनाही यावेळी आदरांजली वाहण्यात आली. प्रा. डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, प्रा. एम. जी. चिकलकर, डॉ. आर. बी. पाटील, डॉ. आर. पी. कावणे, डॉ. डी. डी. सातपुते, प्रा. बी. के. वानोळे, डॉ. संतोष जांभळे, प्रा. वैभव बुद्धे उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
27/11/2019 Page No. 9



# वारणा महाविद्यालयात संविधान दिन

**वारणानगर :**

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयामध्ये ७० वा 'संविधान दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ.सुरेखा शहापुरे होत्या. यानिमित्ताने संविधानाची शपथ देण्यात आली. यावेळी पाचशेहून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना स्वंयसेवकांनी ही या उपक्रमात सहभाग नोंदवला. डॉ. सी.आर.जाधव यांनी संविधान शपथ वाचन केले. २६/११ च्या हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या जवानांनाही यावेळी आदरांजली वाहण्यात आली. प्रो.डॉ.प्रकाश चिकुर्डेकर, प्रा.एम.जी.चिकलकर, डॉ.आर.बी.पाटील, डॉ.आर.पी.कावणे, डॉ.डी.डी.सातपुते, प्रा. बी.के.वानोळे, डॉ. संतोष जांभळे, प्रा.वैभव बुद्धे व सहकारी उपस्थित होते.

# वारणा महाविद्यालयाच्यावतीने मतदान जनजागृती फेरी

**वारणानगर :**

लोकशाही शासन व्यवस्थेच्या बळकटीकरणामध्ये मतदान प्रक्रियेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मतदान प्रक्रियेत टक्का वाढणे गरजेचे असून १८ वर्षावरील प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावून मतदान केलेच पाहिजे. असे मत श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी श्रीमती डॉ.वासंती रासम यांनी व्यक्त केले.

वारणानगर येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयामध्ये सार्वजनिक निवडणूक कृती कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी श्रीमती डॉ.वासंती रासम बोलत होत्या. यावेळी श्रीमती डॉ.रासम आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुरेखा शहापुरे यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवुन सहभाग नोंदविला. या निमित्ताने परिसरात फेरी काढण्यात आली. 'शंभर टक्के मतदान करूया भारताला वैभवशाली करूया, निर्भय होऊनी मतदान करा, देशाचा सन्मान करा, सोडा सारे काम धाम, मतदान करणे पहिले काम, चला मतदान करू या, देशाची प्रगती करूया, मतदान हेचि सर्वश्रेष्ठ दान, एक व्यक्ती एक मतदान, देश होईल बलवान, मतदान करूया देशाची प्रगती घडवुया!' यासारख्या घोषणा फेरीमध्ये देण्यात आल्या. या फेरीत महाविद्यालयाचे प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि विद्यार्थिनींचा लक्षणीय सहभाग होता. डॉ.प्रीती शिंदे, प्रा.शिल्पा पाटील, सोनम भोई, प्रा.उमेश जांभोरे, डॉ.चंद्रकांत जाधव, प्रा.आर.बी.बसनाईक, डॉ. आर.बी.पाटील, डॉ.प्रकाश चिकुर्डेकर आदीनी यामध्ये सहभाग घेतला होता.



**वारणा महाविद्यालयाच्या वतीने 'सार्वजनिक निवडणूक कृती कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती' फेरीच्या शुभारंभप्रसंगी प्रशासकीय अधिकारी डॉ.वासंती रासम, प्राचार्य डॉ.सुरेखा शहापुरे.सोबत प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी.**

# वारणा महाविद्यालयाची मतदान जनजागृती फेरी

प्रतिनिधी

वारणानगर

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयामध्ये सार्वजनिक निवडणूक कृती कार्यक्रमांतर्गत ठमतदान जनजागृतीठ फेरीचे आयोजन करण्यात आले होते. श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी श्रीमती डॉ. वासंती रासम, प्राचार्या डॉ. सुरेखा शहापुरे यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली.

यावेळी डॉ. रासम म्हणाल्या, लोकशाही शासन व्यवस्थेच्या बळकटीकरण मध्ये मतदान प्रक्रियेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मतदान प्रक्रियेत टक्का वाढणे गरजेचे असून १८ वर्षावरील प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावून मतदान केलेच पाहिजे.

या निमिताने परिसरात फेरी काढण्यात आली. शंभर टक्के मतदान करू या भारताला वैभवशाली करूया, निर्भय होऊनही मतदान करा देशाचा सन्मान करा, सोडा सारे काम धाम मतदान करणे पहिले काम, चला मतदान करू या देशाची प्रगती करूया, एक व्यक्ती एक मतदान देश होईल बलवान, मतदान करूया देशाची प्रगती घडवू यासारख्या घोषणा फेरीमध्ये देण्यात आल्या.

फेरीत प्राध्यापक, विद्यार्थी पालक आणी विद्यार्थिनींचा लक्षणीय सहभाग होता. डॉ. प्रीती शिंदे, प्रा. शिल्पा पाटील सोनम भोई, प्रा. उमेश जांभोरे, डॉ. चंद्रकांत जाधव, प्रा. आर. बी. बसनाईक, डॉ. आर. बी. पाटील, डॉ. प्रकाश चिकुर्डेकर यांनी सहभाग घेतला.

### वाचणी माध्यमिकमध्ये विविध कार्यक्रम

**सडोली खालसा :** वाचणी (ता. करवीर) येथील माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जनजागृती मोहीम, स्पर्धा, मतदार संकल्पपत्र, प्रतिज्ञापत्र आदी कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी गावातून काढलेल्या मतदार जनजागृती रॅलीत चला मतदान करू, या देशाची प्रगती करूया, निर्भय होऊन मतदान करा, देशाचा सन्मान करा, सोडा सारे काम धाम मतदान करणे हेच आपले पहिले काम, प्रगती करायची देशाची मतदारराजा निवड कर योग्य त्या व्यक्तीची अशा विविध घोषणांची घोषणाबाजी प्रमात फेरीतून देण्यात आली. मतदान जनजागृती उपक्रम यशस्वी पार पडण्यासाठी साठी मुख्याध्यापक बी. डी. साळवी, वाय. डी. धामणे, विनायक तळेकर व शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केला.

प्रा.डॉ.आर.पी.कावणे
कार्यक्रम अधिकारी

प्रा.डॉ.सी.आर.जाधव
कार्यक्रम अधिकारी